महाराष्ट्र पोलीस

सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

# पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा

सातारा तालुका पोलीस ठाणे

संपर्क- 02162-238607

ईमेल- sataratps.satara@mahapolice.gov.in

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शके ३५०

दिनांक :- 15/04/2026

## प्रेसनोट

### -: मारहाण करुन बुलेट चोरुन घेऊन जाणाऱ्या आरोपींना २४ तासाच्या आत सातारा तालुका पोलीसांनी ठोकल्या बेडया :-

**(सातारा तालुका पोलीस ठाणे डी.बी पथकाची कामगिरी)**

सातारा तालुका पोलीस ठाणे दिनांक १०/०४/२०२६ रोजी फिर्यादी शशिकांत रामचंद्र गोरे वय ३१ वर्ष व्यवसाय खाजगी नोकरी रा.मेढा ता.जावली जि.सातारा मौजे कोंडवे तालुका जिल्हा सातारा गावचे हद्दीतील स्वामी विवेकानंद नगर येथे दुचाकी वाहन (बुलेट) व मोबाईल चार्जर व बॅग असे चोरुन घेऊन गेलेबाबतचा गुन्हा दाखल केला होता.

सदर गुन्हयाचे अनुषंगाने मा. पोलीस अधीक्षक सो, सातारा, तुषार दोशी, मा.अपर पोलीस अधीक्षक सो, सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, मा. उपविभागीय अधिकारी सातारा विभाग, सातारा श्री राजीव नवले यांचे मार्गदर्शनाखाली **सातारा तालुका पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी श्री निलेश तांबे** यांनी सदर गुन्हयातील आरोपीस तात्काळ ताब्यात घेणेबाबत सुचना दिल्याने सातारा तालुका पोलीस ठाणेचे डी. बी. पथकाचे पोलीस अंमलदार पोकॉ संदिप पांडव यांनी घटनास्थळाकडे जाणारे रोडचे व घटनास्थळावरुन बाहेर पडणारे रोडचे सर्व सीसीटीव्ही फुटेज तपासुन सदर आरोपीची गोपनिय माहिती मिळवुन दोन संशयित इसम व १ महिला यांना कोंडवे येथुन ताब्यात घेऊन त्यांच्याकडे कसोशीने चौकशी केली असता चौकशी दरम्यान सदर आरोपी यांनी तक्रारदार यांची मोबाईल चार्जर, बॅग व दुचाकी वाहन चोरुन घेऊन गेलेची कबुली दिली. तसेच आरोपी यांचेकडुन मोबाईल चार्जर, बॅग व दुचाकी वाहन असा एकुण **दोन लाख** रुपयेचा मुददेमाल ताब्यात घेऊन सदर गुन्हयामधील ३ आरोपी अटक केलेले आहेत. सदर गुन्हयाचा अधिक तपास श्री सुदर्शन काटकर सहा. पोलीस निरीक्षक हे करित आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस अधीक्षक सो, सातारा, तुषार दोशी, मा. अपर पोलीस अधीक्षक सो, सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, मा.उपविभागीय अधिकारी सातारा विभाग, सातारा श्री राजीव नवले, सातारा तालुका पोलीस ठाणेचे प्रभारी अधिकारी श्री निलेश तांबे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण पथकाचे श्री.सपोनि सुदर्श काटकर, सपोनि अन्वर मुजावर, श्री.अभिजीत गुरव पोलीस उपनिरीक्षक, पोहवा मनोज गायकवाड, पोहवा दादा स्वामी, पोकॉ संदिप पांडव, पोहवा राजू शिखरे, मपोहवा विदया कुंभार, मपोहवा तेजा तुपे, पोकॉ सचिन झनकर यांनी केलेली आहे.

सर्व अधिकारी व कर्माचारी यांचे श्री. तुषार दोशी, पालीस अधिक्षक सातारा, श्रीमती वैशाली कडुकर, अप्पर पोलीस अधिक्षक सातारा, श्री राजीव नवले, मा. उपविभागीय अधिकारी , सातारा यानी कौतुक व अभिनंदन केले आहे.

पोलीस अधिक्षक सातारा यांच्या मान्यतेने

प्रति,

सर्व वृत्तपत्र संपादक, सातारा जिल्हा

सर्व मिडीया प्रतिनिधी सातारा